# शेतकऱ्यांच्या हितासाठी वखार महामंडळाची नवी भरारी





**श्री. विश्वास भोसले** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
५८३/ ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७

शेतमालाची शास्त्रशुद्ध साठवणूक करणारी आणि त्यासाठी १००%विमा सुरक्षेची सुविधा पुरविणारी महाराष्ट्रातील सर्वमान्य शेतकऱ्यांसाठीची शासकीय यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे कार्य सन १९५७ पासून सुरु आहे. मोठ्या मेहनतीने शेतकरी शेतमाल उत्पादन करतो. त्यासाठी नांगरटीपासून पीक हाती येईपर्यंत त्यावर आर्थिक गुंतवणूक करतो. परंतु शेतावरचा माल बाजारात जाईपर्यंत आणि त्याची विक्री होऊन पैसा हाती पडेपर्यंत त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. विशेषत: धान्याची सुरक्षित साठवणूक व जपवणूक ही त्याची मोठीच डोकेदुखी ठरते. शेतकऱ्यांचा हा जटील प्रश्न सोडवण्याचे महत्त्वाचे काम वखार महामंडळाच्या माध्यमातून आज मोठ्या प्रमाणावर होत आहे.

वखार महामंडळाची राज्यात ८ विभागीय कार्यालये आहेत. त्यांच्या अधिनस्त कार्यरत असलेली १६७ केंद्रे आणि ८०० गोदामे यांचे राज्यभर जाळे पसरलेले असून या माध्यमातून १२ लाख मे. टनांपेक्षा जास्त साठवणूक क्षमता सिद्ध करुन वखार महामंडळामार्फत अधिकाधिक माल सुरक्षितपणे जपलेला आहे. या साठवलेल्या मालाचे मूल्यांकन रु. १५०० कोटी पर्यंत आहे. मालमत्तेचे संरक्षण यशस्वीपणे करणे म्हणजे त्याला नुकसानीपासून वाचवणे. यातून संपत्ती वर्धनाचा हेतूही आपोआप साध्य होतो. हा हेतू साध्य होण्यासाठी महामंडळाची विहित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रथमत: राज्यात जमिनी संपादित करुन गोदामे व वखारी बांधणे हे मुख्य कार्य असून यामध्ये कृषी उत्पादने, बियाणे, खते, कापूसगाठी, औद्योगिक माल आणि अवजारे व याशिवायही काही सूचित समाविष्ट नसलेल्या परंतु जपवणुकीच्या दृष्टीने आवश्यक अशा अन्य वस्तूंची साठवणूक केली जाते. साठवणुकीची महत्त्वाची जबाबदारी जशी महामंडळ उचलते त्याचबरोबर तितकीच महत्त्वाची जबाबदारी म्हणजे कृषी उत्पादने, बियाणे, खते यासह इतर काही बाबी यांची खरेदी, विक्री व वितरण करण्याचेही काम महामंडळ जबाबदारीने करत आहे.

या सुविधा पुरविण्याबरोबरच शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून मंडळाने शेतकऱ्यांसाठी खास म्हणून वखार भाड्यात ५० टक्के सवलत उपलब्ध करुन दिली आहे. याशिवाय शेतमाल सुरक्षित राहण्यासाठी प्रत्येक पंधरवड्यामध्ये कीड प्रतिबंधात्मक व उपचारात्मक कीटकनाशकांचा वापर करुन मालाची शास्त्रशुद्ध साठवणूक केली जाते. सर्व काळजी घेऊनही काही कारणांनी मालाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्यात येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्व साठवणुकीला विमा संरक्षण देण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्यापासून बचाव व्हावा; अशा पद्धतीने कार्यवाहीचे नियोजन केले गेले आहे.

हाताळणी व माल वाहतुकीची सुविधा पुरविताना मान्यताप्राप्त ठेकेदारांमार्फतच ही कार्यवाही केली जात असल्यामुळे शेतकरी या संदर्भात निश्चित राहू शकतो. शेतकऱ्यांची चिंता मिटविण्याचे आणखी एक अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल महामंडळाने उचलले असून ठेवीदारांना दिलेली वखार पावती प्रक्राम्य लेख (निगोशिएबल) आहे व ती बँकेकडे तारण ठेवून ठेवीदारांना बँकेकडून त्या आधारे त्वरित कर्ज मिळू शकते. ही सुविधा पुरवितांना शेतकऱ्यांची कर्जाबाबत इतरत्र होणारी आडवणूक टाळून शेतकऱ्यांना आर्थिक संकटापासून वाचवल्यामुळे मोठा आर्थिक आधार मिळण्याचा एक मार्ग उपलब्ध झाला आहे. कापूसगाठी उत्पादकांना महामंडळाकडे कापूसगाठीची साठवणूक केल्यास साठवणूक दरात १५% सवलत लागू करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांशिवाय इतर आयतकांना आणि निर्यातकांना महामंडळाकडे उपलब्ध जागेतून शुल्कबंध वखारींची सुविधाही जाणीवपूर्वक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महामंडळाच्या उद्दिष्ट्य पूर्तीसाठी आवश्यकता भासल्यास विविध वस्तू आयात करुन सर्वसामान्यांच्या उपयोगासाठी साठवणे व वितरीत करणे, आवश्यकता भासल्यास विविध शासकीय संस्थांशी करारनामा करुन सर्वसामान्यांच्या उपयोगासाठी प्रकल्प राबविणे, समान उद्दिष्ट असणाऱ्या कंपन्याशी सहकार्य करार करणे व गरज भासल्यास सदर कंपन्या महामंडळात विलीन करुन घेणे, याही बाबी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

महामंडळाच्या सदरच्या उपलब्ध सुविधा आणि कार्येयाचे स्वरुप अधिक व्यापक आणि अधिकाधिक शेतकरीभिमुख करण्याच्या दृष्टीने महामंडळाने अनेक महत्त्वाकांक्षी भविष्यकालीन योजना आखल्या आहेत.

भविष्यकालीन योजनांमध्ये मुख्यत: सर्वात प्रथम प्राधान्याने वखार (विकास व विनियमन) कायद्याअंतर्गत तारण कर्ज योजना राबविण्यासाठी बँकेसोबत गोदामांनाही अधिस्वीकृती देऊन निकष पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र गोदामांना सन २०१५ पर्यंत तारण कर्ज योजना राबविण्यासाठी सक्षम बनविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

सन २००८-०९ पर्यंतची स्वमालकीची साठवणूक क्षमता १२.१५ लक्ष मे. टन इतकी असून ती वाढविण्यासाठी प्रतिवर्ष महामंडळाचे स्वनिधीतून रक्कम रु. २५ कोटी खर्च करुन दरवर्षी ७० हजार मे. टन इतकी वाढवायची ठरवली आहे. याशिवाय ही साठवणूक क्षमता सन २०१५ पर्यंत १५ लक्ष मे. टनांपर्यंत पोहचवण्याचे उद्दिष्ट आहे.

अपेडा या मान्यवर संस्थेच्या साहाय्याने शीतगृह स्थापन करुन त्यांच्या सहकार्यातून दरवर्षी ३ ठिकाणी एकूण ३ हजार मे. टन क्षमतेचे शीतगृह बांधून सन २०१५ पर्यंत १८ ठिकाणी १८ हजार मे. टनांची शीतगृह क्षमता निर्माण करण्यासाठी महामंडळाने स्वनिधीतून खर्च रक्कम रु. ६ कोटीचे नियोजन केले आहे.

अपेडाच्याच साहाय्यातून सन २०१४-१५ पर्यंत २५ रेफर कंटेनर घेऊन महाराष्ट्रात शीतसाखळी निर्माण करण्याच्या उद्दिष्टांसाठी महामंडळाने स्वनिधीतून रु. २.५० कोटी निधी राखून ठेवला आहे.

संयुक्त उद्यम अंतर्गत दिघी व रेक्स बंदर याठिकाणी कंटेनर फ्रेट स्टेशन स्थापन करण्यासाठी महामंडळाच्या स्वनिधीतून रु. ३० कोटी रक्कम खर्च करण्याचे ठरवण्यात आले आहे.

नॅशनल कमोडिटी एक्सचेंज सोबत सन २०१२ पर्यंत २० ठिकाणी आणि सन २०१५ पर्यंत १०० ठिकाणी कास्तकार व व्यापाऱ्यांसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंज अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचेही प्रस्तावित आहे. यासाठीचा खर्च शासनाकडून जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत वार्षिक रु. ३.५१ कोटी मिळणार असून याचा अंदाजित खर्च एकूण रु. १७.५५ कोटी अपेक्षित आहे. या सर्व नियोजनातून महामंडळाची उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढणार असून सध्याची रक्कम रु. २०० कोटींपर्यंत वाढवण्यात येणार आहे आणि सध्याचा नफा रक्कम रु. ३५ कोटींवरुन रु. ७० कोटीपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून नियमित काळजी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने धुरीकरणासारख्या शास्त्रशुद्ध उपाययोजनांचे संस्करण ही महामंडळाची खास वैशिष्ट्ये मंडळाने आजपर्यंत कसोशीने जपली आहेत. चोरीसारख्या इतर अनेक धोक्यांपासून विम्याच्या संरक्षणाचा भक्कम आर्थिक आधार शेतकऱ्यांच्या पाठीशी राहण्यासाठी शेतकऱ्यांनी मंडळातच धान्य साठवावे; कारण त्याआधारे त्यांना बँकेकडून सुलभरितीने ९० टक्क्यांपर्यंत कर्ज उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था होणार आहे.

शेतकरी सहकारी व सरकारी संस्था तसेच औद्योगिक प्रतिष्ठान यांच्या मागणीप्रमाणे धान्य सुरक्षेच्या विविध उपाय योजना म्हणून कीटकनाशक फवारणी, बाह्य धुरीकरण, शेतीवरील पिकांवर औषध फवारणी इ. उपाय केले जाणार आहेत.

शेतकऱ्यांच्या शेतीमालाला २५ टक्के राखीव साठवण क्षमता आणि साठवणूक भाड्यात ५० टक्के सूट ही शेतकऱ्यांसाठी विशेष सवलत योजना असून याचा शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, हीच महामंडळाची मनापासून इच्छा आहे.

*दाणा दाणा जोडावा । महामंडळाकडे सोपवावा*
*सुगीचा सोहळा थाटावा । वर्षभरी... ।।*

अशा तऱ्हेने फक्त सुगीतच नव्हे तर वर्षभर शेतकऱ्यांचा माल साठविण्यासाठी वखार महामंडळ कटीबद्ध असून अन्नधान्ये, बियाणे, ज्यूटचे तागे, खत व कीटकनाशके अशा शेतीविषयक सर्व मालांची साठवण करणारी अग्रगण्य संस्था म्हणून वखार महामंडळाची भूमिका भविष्यकाळात अतिशय महत्त्वपूर्ण राहणार आहे.

शेवटी शेतकऱ्यांना एवढेच सांगणे आहे की,

*शेतकरी राजा,*
*जिवापाड जपू, तुझं शेतातलं धन...!*
*मायेने राखू, सांभाळू, हेच आमचं वचन...* (क्रमश:)

**शेतकऱ्यांच्या हिताच्यादृष्टीने महामंडळाच्या योजना :**

*महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची राज्यात १६८ ठिकाणी ७५२ गोदामे कार्यरत आहेत.

* शेतकऱ्यांच्या शेती मालाची महामंडळाच्या सर्व वखार केंद्रांवर तज्ञ कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली शास्त्रशुद्ध साठवणूक, किटकनाशकांची फवारणी व धुरीकरण व्यवस्थापनामुळे मालाचा दर्जा उत्तम राखते.

* सुगी हंगामाच्या वेळी बाजार दर कमी असताना जास्तीत जास्त कृषिमालाची साठवणूक करून आणि हंगाम नसताना त्यांची विक्री करून शेतकऱ्यांस जास्त दर मिळविण्याच्या दृष्टीने साठवणुक योजना.

*साठवणूक कालात उत्पादीत शेतीमालावर महामंडळाकडून मूळ साठवणूक दरात ५०% सवलत.

* सर्व वखार केंद्रावर शेतकऱ्यांच्या शेतीमालासाठी २५ % पर्यंत साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देण्यास महामंडळ कटीबद्ध.

* शेतकऱ्यांच्या शेतीमाल साठवणुकीसाठी १००% विमा संरक्षण.

* हाताळणी व वाहतुकीची सुविधा मान्यताप्राप्त ठेकेदारांतर्फे पुरविली जाते.

* शेतकऱ्यांना दिलेली महामंडळाची वखारपावती परक्राम्य लेख (Negotiable Instrument)आहे, ती बँकेकडे तारण ठेवून ठेवीदारांना बँकेकडून कर्ज उपलब्ध होणेसाठीची तरतूद.

त्यामुळे शेतकऱ्यांना हंगामात बँकेकडून अर्थ सहाय्य व नंतर बाजारभाव येईपर्यंत साठवणूक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन.

* महामंडळाने युनियन बँक ऑफ इंडिया यांच्याशी प्रथम टप्प्यात ४० ठिकाणी शेतकऱ्यांकरिता त्वरित कर्ज मिळणेसाठी करार केला आहे. ही सुविधा राज्यातील सर्व गोदामांसाठी दि. १/०१/२०११ पासून लागू.

**मुख्य कार्यालय**

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,**५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.फोन : ०२०-६६२६६८००, २४२६२९५१
फॅक्स : ०२०-६६२६६८२९, ६६२६६८३९, ६६२६६८४९
E-mail: : mswcinfo@mswarehousing.com/mswc2k@yahoo.com
Website : www.mswarehousing.com